**सुभाषित :**

व्रजन्ति ते मूढधिय: पराभवं भवन्ति मायाविषु ये न मायिन: |
प्रविश्य हि घ्नन्ति शठास्तथाविधानसंवृताङ्गान्निशिता इवेषव: ||

**अर्थ :**

कपटी लोकांशी जे कपटीपणे वागत नाहीत, त्या बावळट माणसांचा पराभव होतो. धारदार बाणाने उघड्या (कवच नसलेल्या त्वचे)वर आघात होतो, त्याप्रमाणेच तशा प्रकारच्या (भोळसटपणे विश्वास ठेवणाऱ्या) माणसांचा ठग नाश करतात.